# जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नाशिक (गृह शाखा)

## फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये आदेश

क्र.कक्ष१/पिओएल१/ १४४५ /२०२० — नाशिक दिनांक - २२/०३/२०२०

**आदेश**

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषित केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात, नाशिक जिल्हयामध्ये गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. तसेच महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.करोना २०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य ५, दिनाक १३/०३/२०२० अन्वये कोरोना विषाणूचा (कोवीड १९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.करोना/२०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य ५, दिनांक १४/०३/२०२० अन्वये महाराष्ट्र कोविड १९ उपायोजना, नियम २०२० अन्वये प्रसिध्द केलेली आहे.

ज्याअर्थी, कोरोना विषाणुचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणुन नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्याच्या पार्श्वभूमीवर परस्पर संपर्कामुळे या विषाणुचा संसर्ग व प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जीविताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होऊ शकते याची माझी खात्री झालेली आहे. त्याअनुषंगाने सारासार विचार करुन तातडीची प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील तरतुदींचे अनुषंगाने स्थानिक निवासी, अभ्यागत, वारंवार कामानिमित्त नाशिक जिल्ह्यात प्रवेश करणारे यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, **मी, सूरज मांढरे, जिल्हादंडाधिकारी, नाशिक**, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन ५ पेक्षा जास्त लोकांना एकाच वेळी एका ठिकाणी एकत्र येण्यास प्रतिबंध करित आहे.

तथापि, सदर आदेश जीवनावश्यक वस्तु व सेवा (उदा.औषधालये, अत्यावश्यक किराणा सामान (Grocery), फळे, भाजीपाला व मांस विक्री केंद्रे, दूध विक्रीची दुकाने, तसेच रुग्णालये / दवाखाने, पॅथॉलॉजी लॅबोरेटरी), तसेच उक्त वस्तुंची वाहतुन आणि पुरवठा करणारे घटक आणि साखळी, शासकिय / निमशासकिय कार्यालये, हवाई वाहतुकी संदर्भातील विभाग, पिण्याचे पाणी पुरवठा करणारे व सांडपाणी निचरा व्यवस्थापन करणाऱ्या आस्थापना, वखार महामंडळ, सर्व बँका / वित्तीय संस्था, दूरध्वनी व इंटरनेट सेवा पुरवठा करणाऱ्या आस्थापना, विद्युत पुरवठा, पेट्रोलियम, ऑईल व ऊर्जा संसाधने, प्रसार माध्यमे, मिडीया, अत्यावश्यक सेवा देणाऱ्या आय.टी.आस्थापना, पोस्टल सेवा, अधिकृत कुरियर सेवा यांना लागु असणार नाही. उपरोक्त आस्थापनांनी शक्यतोवर कमीत-कमी मनुष्यबळाचा वापर करुन त्यांचे दैनंदिन कामकाज करावे तसेच ज्या आस्थापना पुर्णपणे बंद ठेवण्यासंदर्भात यापुर्वीचे आदेश देण्यात आलेले आहेत ते आदेश तसेच कायम ठेवण्यात येत असुन त्या आस्थापना पुढील आदेशापर्यंत तशाच पुर्णतः बंद राहतील आणि या संदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचना सदर आस्थापनांवर बंधनकारक राहतील.

**सदरचा आदेश दिनांक २२/०३/२०२० चे सायं. ०५.०० वाजेपासुन ते दिनांक - २३/०३/२०२० रोजीचे सकाळी ०५.०० वाजेपावेतो संपूर्ण नाशिक जिल्ह्यासाठी अंमलात राहील.**

**तसेच सदरचा आदेश दिनांक २३/०३/२०२० चे सकाळी ०५.०० वाजेपासुन ते दिनांक - ३१/०३/२०२० रोजीचे रात्री १२.०० वाजेपावेतो संपूर्ण नाशिक जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, कटक मंडळे या क्षेत्रांना तसेच या क्षेत्रांमधुन ज्या आस्थापनांमध्ये कर्मचारी प्रवास करुन जातात अशा आस्थापनांच्या कार्यक्षेत्रातही अंमलात राहील.**

सदरचा आदेश आज दिनांक २२/०३/२०२० रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिला असे.

(जिल्हादंडाधिकारी नाशिक — शिक्का)

ठिकाण :- नाशिक
दिनांक : - २२/०३/२०२०

**( सूरज मांढरे )**
**जिल्हादंडाधिकारी नाशिक**

प्रति

१) मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचेकडेस माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सविनय सादर.
२) मा.पोलिस अधिक्षक, (ग्रामीण) नाशिक यांचेकडेस माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सादर.
३) उपविभागीय दंडाधिकारी / तहसिलदार (सर्व) यांचेकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत-१) मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस माहितीसाठी सविनय सादर
२) जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक यांचेकडेस स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द देणेकामी रवाना.

जिल्हादंडाधिकारी, नाशिक